# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २९९ वा गुरूवार दि.०९ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ‘टीम वर्क’ आणि सर्वांच्या सहकार्यामुळे मतदान प्रकिया शांततेत -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर :– लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर मतदारसंघात ६२.५९ टक्के मतदान झाले. मतदान प्रक्रियेतील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी केलेलं ‘टीम वर्क’ आणि प्रसारमाध्यमे, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या सहकार्यामुळे मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडल्याचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे सांगितले. शांतताप्रिय जिल्हा अशी ओळख असलेल्या लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी आपली परंपरा जोपासत निवडणुकीत अतिशय उत्साहाने सहभाग नोंदवून मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यास मदत केल्याबद्दल सर्व लातूरकरांचे जिल्हाधिकाऱ्यांनी आभार मानले. तसेच मतमोजणी प्रक्रियेचा टप्पाही याचप्रमाणे शांततेत पूर्ण करण्यासाठी सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी आतापासूनच तयारी करावी, असेही त्यांनी सांगितले. महिला शासकीय निवासी तंत्रनिकेतन येथील मतदान यंत्र सुरक्षा कक्ष सीलबंद केल्यानंतर जिल्हाधिकारी बोलत होत्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा कौशल्य विकास सहायक आयुक्त बालाजी मरे यांच्यासह सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार यावेळी उपस्थित होते. लोकसभा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून विविध पथकांमध्ये कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. प्रत्येकाने आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पडल्यामुळे मतदानापर्यंतचा टप्पा शांततेत पार पडला आहे. महसूल प्रशासन, पोलीस प्रशासन आणि इतरही विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी एकजुटीने काम करून मतदान प्रक्रिया यशस्वी केल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या. निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्वाचा घटक असलेल्या मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी प्रशासनाला प्रसारमाध्यमांनी अतिशय उत्कृष्ट सहाय्य केले. मतदार जागृतीसाठी प्रसारमाध्यमांनी महत्वपूर्ण भूमिका बजाविल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी लातूरची संस्कृती जोपासत समजूतदारपणाची आणि समन्वयाची भूमिका घेवून निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य केले. निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी यापूर्वी पाच निवडणुकांमध्ये निवडणूक निरीक्षक म्हणून काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा जिल्हा निवडणूक यंत्रणेला चांगला उपयोग झाल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले. निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन आणि सूचनांमुळे मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यास मदत झाली, त्यामुळे जिल्हा



निवडणूक यंत्रणेच्यावतीने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल यांना निरोप

परिविक्षाधीन जिल्हाधिकारी म्हणून लातूर येथे वर्षभरापूर्वी रुजू झालेले नमन गोयल यांचा लातूर येथील कार्यकाळ पूर्ण झाला असून ते पुढील प्रशिक्षणासाठी नवी दिल्ली येथे जात आहेत. याबद्दल जिल्हा प्रशासनाच्यावतीने त्यांचा सत्कार करून निरोप देण्यात आला. लातूर येथे विविध जबाबदाऱ्या सांभाळताना खूप काही शिकायला मिळाले. लातूरकर अधिकारी, कर्मचारी यांनी भरभरून प्रेम दिले. येथील आठवणी कायमस्वरूपी लक्षात राहतील, अशी भावना सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांचे त्यांनी आभार मानले.

मतदान यंत्राच्या सुरक्षा कक्षाबाहेर चोख बंदोबस्त

लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदान यंत्रे महिला शासकीय निवासी तंत्रनिकेतन येथील सुरक्षा कक्षात ठेवण्यात आली आहेत. याठिकाणी केंद्रीय राखीव पोलीस दल आणि राज्य पोलीस दलाचा चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच परिसरात जागोजाती सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आली असून कंट्रोल रूमच्या माध्यमातून येथील हालचालींवर नजर ठेवली जात आहे. सीसीटीव्ही चे चित्रीकरण उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना पाहता यावे, यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी अहोरात्र मेहनत घेतल्याबद्दल काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख यांचे मानले आभार

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची सार्वजनिक महात्मा बसवेश्वर जयंती औसा रोड लातूर शिष्टमंडळाने बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन महात्मा बसवेश्वर जयंतीचे त्यांना निमंत्रण दिले. यावेळी नरेश पेद्दे, महेश नागलगावे, उमेश लोखंडे, अजय मोरे, अभिषेक पतंगे आदी उपस्थित होते.



लातुर / प्रतिनिधी : – राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. ८ मे रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख यांची भेट घेऊन लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेतल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते बूथप्रमुख यांच्याकडून मतदानाची आकडेवारी त्या त्या भागातील मतदानाचे वातावरण आदी विविध विषयावर चर्चा करून माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातील लातूर शहर निलंगा उदगीर शहर विधानसभा मतदारसंघ निहाय मतदानाचा आढावा घेऊन आपल्या बुथवर ८० टक्के मतदान करून घेतलेल्या बूथ प्रमुखांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोइज शेख, विलास को–ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, माजी महापौर दीपक सूळ, काँग्रेसचे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे निरीक्षक सर्जेराव मोरे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, उदगीर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक रवींद्र काळे, उदगीर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी चंदन पाटील नागराळकर, प्रा.शहाजी मुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर तालुकाप्रमुख चंद्रकांत टेंटोल, शहरप्रमुख अनिल पंचाक्षरी, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडीले, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, उपसभापती प्रीती भोसले, प्रा. प्रवीण कांबळे, निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक संतोष देशमुख, माजी नगराध्यक्षा उषा कांबळे, डॉ.जी.बी.सोनकांबळे, सचिव अभय साळुंके, मंजूरखान पठाण, सचिन बंडापले, महेश काळे,डॉक्टर अरविंद भातंबरे, चक्रधर शेळके, गिरीश ब्याळे, अंगद वाघमारे, पंकजशेळके, महेश देशमुख, पद्माकर उगिले, विजयकुमार साबदे, फारुक शेख,आबासाहेब पाटील उजेडकर, पुनित पाटील, माजी सभापती अजित माने, निलंगातालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील, व्यंकटेश पुरी, प्रवीण सूर्यवंशी, राजा माने, अशोक कोरे, बसवराज मठपती, संतोष बिरादार, दत्ता सुरनर, अशोक गोविंदपुरकर, सपना किसवे, एन.आर. पाटील, आनंद पवार, दिलीप पाटील नागराळकर, रवींद्र कोरे, जगदीश बाहेती, राजकुमार पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, असिफ बागवान, कैलास कांबळे, अहमदखा पठाण, राजा माने, अभिजीत अंकलकोटे, बसवंतआप्पा भरडे, दगडूआप्पा मिटकरी, गोविंद डुरे, चंद्रकांत मद्दे, विजय गायकवाड, विवेक जाधव, हर्षवर्धन सवई, यशपाल कांबळे, तबरेज तांबोळी, खाजा शेख, विष्णुदास धायगुडे आदीसह काँग्रेस पक्षाचे महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, बुथप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशात ४९ मतदारसंघातून ६९५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात, महाराष्ट्रात १३ जागांसाठी २६४ उमेदवार

नवी दिल्ली, : लोकसभा निवडणूकीच्या ५ व्या टप्प्यात देशातील ४९ मतदारसंघातून ६९५ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत. निवडणूक आयोगाने बुधवारी (८ मे) जाहीर केलेल्या माहितीनुसार, देशात ५ व्या टप्प्यात ८ राज्य/ केंद्रशासित प्रदेशात मतदान होणार आहे. तर महाराष्ट्रात १३ लोकसभा जागांवर मतदान होणार असून, २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.




लोकसभा निवडणूकीच्या ५ टप्प्यासाठी ३ मेरोजी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख होती. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, देशातील ४९ मतदारसंघांमधून १५८६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ७४९ अर्ज छाननीनंतर निवडणूक आयोगाने वैध ग्राह्य केले. त्यानंतर काही उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यावर ही संख्या ६९५ इतकी राहिली आहे. देशात ५ टप्प्यासाठी २० मेरोजी मतदान होणार आहे. ५ व्या टप्प्यासाठी देशात महाराष्ट्रातून सर्वाधिक ५१२ अर्ज दाखल

लोकसभा निवडणुकीच्या ५ व्या टप्प्यासाठी महाराष्ट्रातील १३ जागांवर मतदान होणार आहे. त्यासाठी सर्वाधिक ५१२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. अर्ज छाननी आणि उमेदवारांच्या माघारीनंतर आता महाराष्ट्रातील १३ जागांसाठी २६४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यापाठोपाठ उत्तर प्रदेशातून १४ लोकसभा जागांसाठी ४६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.

## रामदास आठवलेंची राहुल गांधीविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार

नवी दिल्ली, : काहीही झाले तरी कोणीही संविधान बदलू शकत नाही, भाजप संविधान बदलेल, असे म्हणून काँग्रेस नेते राहुल गांधी चुकीची आणि आक्षेपार्ह वक्तव्य करत आहेत, या संदर्भात त्यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले. नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार का? पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कायमच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर मार्गक्रमण केले. काहीही झाले तरी कोणीही संविधान बदलू शकत नाही. मात्र, राहुल गांधी भाजप सत्तेत आल्यास संविधान बदलेल, असा चुकीचा दावा करतात, त्यांच्या या वक्तव्याची निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे, असे आठवले यांनी सांगितले.

रामदास आठवले म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधानाची भावना वास्तवात उतरवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र राहुल गांधी आणि विरोधकांची इंडिया आघाडी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रतिमेला धक्का लावण्यासाठी भाजप संविधान बदलेल, अशी भाषा करत आहेत. कुठल्याही परिस्थितीत असे होऊ शकत नाही. पंतप्रधान मोदींसह भाजपने यावर स्पष्टीकरण देऊनही राहुल गांधी आणि इंडिया आघाडीतील नेते वारंवार या वक्तव्याचा पुनरुच्चार करत आहेत, म्हणून याप्रकरणी राहुल गांधींची निवडणूक आयोगाकडे तक्रार केली, असेही आठवले म्हणाले.पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार आरक्षणाला धक्का लावणार नाही. भाजप संविधान बदलवेल हे आक्षेपार्ह विधान आहे. तसेच भाजप मुस्लिमविरोधी आहे,असे म्हणत काँग्रेस भाजप आणि मोदींविरुद्ध चुकीची माहिती पसरवत आहे. देशात २६ नोव्हेंबर संविधान दिन म्हणून पंतप्रधान मोदींच्या काळात सुरू झाला. काँग्रेसने मात्र ते केले नाही. तसेच काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठीही काही केले नाही. मुंबईत इंदू मिलच्या ठिकाणी बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक तयार होत आहे. त्यासाठी एनडीए सरकारने काम केले आहे. पंतप्रधान मोदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन काम करत आहेत, असेही आठवले म्हणाले. एनडीएच पुन्हा सत्तेत येईल देशात एनडीएसाठी अनुकूल वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर देशातील जनतेचा विश्वास आहे. उत्तरेत भाजप आधीच मजबूत आहे, कर्नाटक, तेलंगणासह दक्षिणेतही भाजपला चांगल्या जागा मिळतील, असा विश्वास रामदास आठवले यांनी व्यक्त केला. तर जातिनिहाय जनगणनेबाबत बोलताना आठवले म्हणाले की, जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे ही मी केलेली मागणी आहे. मी यावर राज्यसभेतही बोललो आहे. काँग्रेसने माझी मागणी कॉपी केली आहे, असेही ते म्हणाले.

## उबाठा गट निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये विलीन होणार, फडणवीसांचा खोचक टोला

जळगाव हिंदुह्रदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते की, काँग्रेससोबत जेव्हा युती करायची वेळ येईल तेव्हा मी शिवसेनेचे दुकान बंद करेल. मात्र त्यांच्या मुलाने काँग्रेससोबत युती केली. एवढच काय तर निवडणुकीनंतर ते काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची खोचक टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे झालेल्या महायुतीच्या सभेत देवेंद्र फडणवीस बोलत होते. ते पुढे म्हणाले, हिंदुह्रदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते की, ज्यावेळेस काँग्रेससोबत युती करण्याची वेळ येईल त्यावेळेस शिवसेनेचे दुकान बंद करेन मात्र त्यांच्या मुलाने काँग्रेससोबत नुसती युतीच नाही केली तर निवडणूकी नंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची टीका त्यांनी केली. ज्यांचे



अस्तित्वच उरले नाही, ते आपल्यासमोर उभे आहेत अशीही टीका त्यांनी केली.

फडणवीस यांनी यावेळी भाजपसोडून शिवसेना ठाकरे गटात गेलेल्या माजी खासदार उन्मेश पाटील यांच्यावरही निशाणा साधला. त्यांचे तिकीट का कापले यावर त्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे. त्यानंतर त्यांच्या लक्षात येईल की नेमकी काय चुक झाली ते. खरं म्हणजे त्यांचे तिकीट कापून त्यांना वाचवले आहे. नाहीतर ते ज्या मार्गाने चालले होते त्या मार्गापासून आम्ही त्यांना परावृत्त केले आहे. यापेक्षा अधिक बोलणे उचित होणार नाही असेही फडणवीस म्हणाले.

ही निवडणूक साधीसुधी निवडणूक नाही देशाला नेता निवडण्याची निवडणूक आहे. देशाचे भवितव्य ठरवण्याची निवडणूक आहे.

दुसरीकडे २४ पक्षांची खिचडी निवडणुकीत दोन पर्याय मतदारांसमोर आहे. विकासाकडे नेणारे मोदी म्हणजे महायुती आहे. तर, दुसरीकडे राहुल गांधी गांधीच्या नेतृत्वात २४ पक्षांची खिचडी आहे. तिथे कोणीच कोणाला नेता मानायला तयार नाही. तर महायुती म्हणजे विकासाची ट्रेन आहे. महायुतीच्या ट्रेनचे इंजिन आणि बोगी सबका साथ सबका विकास करणारी आहे. दुसरीकडे राहुल गांधींचे इंजिन आहे, त्याला बोगीच नाही. या देशांमध्ये प्रथम आदिवासी महिलेला राष्ट्रपती करणारे मोदींसारखे नेतृत्व आहे. ज्यांनी आदिवासी नेतृत्वाला प्राधान्य देऊन संविधानाच्या सर्वोच्च पदावर बसविल्याचे फडणवीस म्हणाले.

## संपादकीय....

# महिला मतदारांचे सामर्थ्य

लोकशाहीचा उत्सव १९ एप्रिलपासून सुरू झाला आहे. सत्तेची धुरा कोणाच्या हाती असेल, हे आगामी काळच सांगेल; परंतु यात निर्णायक भूमिका ही महिला मतदारांची असेल, यात तिळमात्र शंका नाही. गेल्या काही दशकांत महिला या महत्त्वाचा मतदार गट म्हणून समोर येत आहे. पुरुष मतदारांच्या एक पाऊल पुढे टाकत लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी मतदानाची जबाबदारी पाडत महिलांनी केलेली कामगिरी ही सुखद आहे. देश आणि जगभरातील आतापर्यंतच्या अभ्यासात सामाजिक-आर्थिक समानता ही केवळ मतदानापुरतीच मर्यादित असल्याचे बोलले जात आहे. त्याचवेळी आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनीही अनेक काळापासून भारतात लिंग समानता दुर्मीळ असल्याचे ठसविण्याचा प्रयत्न केला; परंतु आता चित्र बदलले असून, महिलांच्या स्थितीत झालेला बदल हा जगभरातील संशोधकांच्या अभ्यासाचा विषय ठरला आहे. लिंग समानता असल्याशिवाय महिलांची मते वाढत नाहीत किंवा भारताने आता लिंग भेदाभेदाची दरी पार केली आहे, हे मान्य करावे लागेल; कारण आतापर्यंत सशक्त नसलेल्या आणि लिंग भेदाभेदाचा सामना करणार्या महिला या क्वचितच मतदान केंद्रापर्यंत पोहोचायच्या; पण भारतीय महिला एक सक्षम मतपेढी म्हणून नावारूपास येईल, अशी भविष्यवाणी 'आयरिश टाइम्स'ने ३ डिसेंबर, १९५१ रोजी केली होती. 'इंडियन इलेक्शन कुड बी हाऊसवाईफ चॉईस' या लेखात म्हटले आहे की, आगामी काळात राजकारणात मोठा वाटा उचलणारे राजकीय पक्ष हे आपल्या जाहीरनाम्यात आणि उमेदवार निवडीत त्यांना (महिलांना) समाधानकारकरीत्या सामावून घेण्याचा प्रयत्न करतील आणि तसे घडतही आहे.आज कोणताही राजकीय पक्ष महिलांचा अवमान करण्याची जोखीम उचलू शकत नाही; कारण निरक्षर महिला किंवा उच्चशिक्षित किंवा गृहिणी किंवा नोकरदार असो, यातील कोणतीही महिला ही संभ्रमित असल्याचे वाटत नाही. कोणाला मतदान करायचे आहे, याबाबत तिला चांगलेच ठाऊक आहे. महिलांचे प्रश्न, भावना, आशा-आकांक्षा, वेदना समजून घेणारा आणि महिलांचे हित साधणार्या पक्षाचा विजय हा निश्चित असतो, हे आता कळून चुकले आहे. अर्थात, ही बाब बिहारच्या २०१५ मधील निवडणुकीच्या निकालात अधोरेखित झाली. 'मुख्यमंत्री, कृपया दारू बंद करा.आमचे घर उद्धस्त होत आहे,' अशी मागणी महिलांनी विधानसभेच्या निवडणुकीला चार महिने राहिलेले असताना (९ जुलै, २०१५) बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याकडे पाटणाच्या मेमोरियल हॉलमध्ये केली होती. नितीशकुमार यांनी ही मागणी योग्य असून, आमचे सरकार आल्यास दारू बंद करू, अशी घोषणा केली. त्याचा परिणाम आपल्यासमोर आहे. नितीशकुमार यांच्या जेडीयू, राजद आणि काँग्रेसच्या आघाडीने १७८ जागा जिंकल्या. राज्यात सुमारे ६०.५७ टक्के महिलांनी मतदान केले. पुरुषांच्या तुलनेत ७ टक्के अधिक. महिलांचे हित साधण्यात तृणमूल काँग्रेसही मागे राहिलेली नाही. महिला सरकारी कर्मचार्यांच्या भत्त्यात वाढ, सायकल योजना यासारख्या धोरणांमुळे ममता बॅनर्जी यांची महिला समर्थक अशी प्रतिमा तयार करण्यात मोठा हातभार लागला.काही दिवसांपूर्वीच मध्य प्रदेशमध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयात 'लाडली बहन योजना' ही एक ट्रम कार्डच्या रूपातून समोर आली. एकंदरीतच महिला या कोणाच्याही बोलण्याला भरीस पडणार नाहीत, हे समजून घेतले पाहिजे. कोणताही पक्ष हा महिलावर्गाची दिशाभूल करू शकतो, या तथ्यातही अर्थ राहिलेला नाही. अर्थात, भावनिक किंवा महिला हिताचा मुद्दा असेल तर महिला संबंधित पक्षाला आणि नेत्याला निवडून देतात. आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि बाजारातील चढ-उताराचा त्यांच्यावर काही प्रभाव पडत नाही; परंतु त्यांच्या मूलभूत गरजा समजून घेणारे नेतृत्व असणे ही त्यांची गरज असते. व्यक्तिगत आणि संस्थागत पातळीवर होणार्या घडामोडींचा परिणाम मात्र त्यांच्यावर होतो. पाच दशकांपासून राज्य व राष्ट्रीय निवडणुकीतील पुरुष व महिला मतदानाच्या आकड्यांचे विश्लेषण करताना पारंपरिक रूपाने मागास व अपेक्षेपेक्षा अधिक विकसित राज्य, अशा दोन्ही ठिकाणी महिलांची अस्मिता, सक्षमीकरणाचे सिद्धांत दृष्टिपथात असल्याचे दिसते. भारतीय महिला घरातील पुरुषांच्या मतानुसार मतदान करतात, या म्हणण्याला मतदानाचे आकडे व निवडणुकीचे निकाल पाहिले तर मेळ बसत नाही. विविध अभ्यासातील निष्कर्ष काढताना महिला मतदारांनी दबक्या स्वरात काही गोष्टी मांडल्या. मत देताना कुटुंबाने ठरविलेला निर्णय पाळला जातोच असे नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.मतदानातील स्वायतत्ता ही गेल्या दशकभरातील लोकसभा निकालातून स्पष्टपणे पाहावयास मिळते. त्यामुळे काही दशकांपूर्वी महिलांना 'मिसिंग वुमनफ'च्या रूपातून पाहिले जात होते किंवा चर्चा केली जात असताना आज महिला 'इन द मिडल' झाली आहे. चांगले शिक्षण, वाढती जनजागृती व आर्थिक स्वावलंबीपणामुळे निम्म्या लोकसंख्येच्या निर्णयाला सशक्तपणा आला आहे. केंद्र व राज्य सरकार महिला कल्याणाच्या योजना आणण्यासाठी आग्रही असल्याचे महिलांना कळून चुकले आणि त्या आधारावर महिला आपले हित साधण्यास सक्षम ठरल्या.'इकॉनॉमिक रिसर्च डिपार्टमेंट स्टेट बँक ऑफ इंडिया'चा अहवाल 'जर्नल इलेक्शन २०२४'च्या 'सेलिब्रेटिंग वुमन लीड फेस्टिव्हल ऑफ डेमोक्रसी हाऊ द नेरटिव्ह हेज चेंज्ड फ्रॉम मिसिंग वुमेन टू वुमेन इन द मिडल इन द लास्ट डिकेड'मध्ये म्हटले आहे की, सरकारच्या विविध योजनांत महिलांचा वाटा वाढण्याबरोबरच (स्टँडअप इंडियात महिलांचा वाटा ८ टक्के, मुद्रा कर्जात ६८ टक्के, 'पीएमएसबीवाय'मध्ये ३७ टक्के, 'पीएमजेजेबीवाय'मध्ये २७ टक्के) गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, तेलंगणात महिलांचा निवडणुकीतील सहभाग वाढला आहे.

# सीबीआयचा मालक कोण?




सीबीआयवर भारत सरकारचे नियंत्रण नसल्याचे केंद्र सरकारने गुरुवार, २ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात स्पष्ट केले. राज्यातील अनेक प्रकरणांचा तपास सीबीआयकडे सोपविण्याला आक्षेप घेणारी याचिका पश्चिम बंगाल सरकारने दाखल केली आहे. त्यावर केंद्र सरकारने याबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज्यघटनेच्या कलम १३१ अंतर्गत प. बंगाल सरकारने केंद्राविरुद्ध सुप्रीम कोर्टात खटला दाखल केला आहे. न्या. बी. आर. गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी झाली. सीबीआयने राज्याच्या परवानगीशिवाय अनेक प्रकरणांचा तपास हाती घेतला आहे. सीबीआय एफआयआर नोंदवून तपास करत असल्याचा आरोप प. बंगाल सरकारतर्फे करण्यात आला आहे. राज्याने आपल्या अधिकार क्षेत्रात सीबीआयला विविध प्रकरणांची चौकशी करण्यासाठी दिलेली सर्वसाधारण संमती मागे घेतल्यानंतरही हे घडत असून असे करणे चुकीचे आणि संघराज्य रचनेच्या विरोधात आहे, असे प. बंगालमधील ममता बॅनर्जी सरकारचे म्हणणे आहे.

प. बंगाल सरकारने दाखल केलेल्या या दाव्यावर केंद्राने सीबीआय आमच्या 'नियंत्रणात' नसून स्वायत्त असल्याचे म्हटले आहे. केंद्र तसेच एक किंवा अधिक राज्यांमधील वादात सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ अधिकारक्षेत्राशी निगडीत कलम १३१ आहे. घटनेचे कलम १३१ हे सर्वोच्च न्यायालयाला दिलेले 'सर्वांत पवित्र अधिकार क्षेत्रांपैकी एक' आहे आणि या तरतुदीचा गैरवापर होऊ दिला जाऊ शकत नाही, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्र सरकारच्या वतीने सांगितले. तसेच ज्या गुन्ह्यांचा सीबीआयने नोंद केल्याचा उल्लेख राज्य सरकारने केला आहे, ते केंद्र सरकारने नोंदविलेले नाहीत. भारत सरकारने कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही, सीबीआयने ते दाखल केलेले आहेत असे तुषार मेहता म्हणाले.

खरे तर, १६ नोव्हेंबर २०१८ रोजी प. बंगाल सरकारने सीबीआयला तपासाबाबत किंवा राज्यात छापे टाकण्याबाबत दिलेली संमती मागे घेतली होती. त्यानंतरही सीबीआय गुन्हे नोंदवत असल्याच्या विरोधात प. बंगाल सरकारने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. सीबीआयला कुठल्याही राज्यात तपास करण्यासाठी संबंधित राज्य सरकारच्या परवानगीची आवश्यकता असते, असे असतानाही अनेक राज्यांमध्ये केंद्र सरकारच्या आदेशावरून विरोधी पक्षाच्या नेत्यांना खोट्या प्रकरणामध्ये गोवले जात असल्याचे अनेकवेळा आढळून आले आहे. सीबीआय, ईडी आणि आयटीच्या आडून विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबणा-या केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टातही 'खोटे बोल पण रेटून बोल'चे धोरण अवलंबिलेले दिसते. सीबीआय तपासाला मंजुरी दिली नसतानाही अनेक प्रकरणांमध्ये तपास सुरू असल्याच्या विरोधात प. बंगाल सरकारने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. या प्रकरणी आज (९ मे) पुढील सुनावणी होणार आहे. राज्याशी संबंधित कोणत्याही प्रकरणात सीबीआय तपासासाठी राज्य सरकारच्या परवानगीची गरज असते. प. बंगाल सरकारने १६ नोव्हेंबर २०१८ रोजी सीबीआयकडून तपासाची परवानगी काढून घेतली होती. चिटफंड घोटाळाप्रकरणी केंद्र सरकार केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा आरोप प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला होता. सीबीआयला तपासाचे आदेश केंद्र सरकार देऊ शकते. हायकोर्ट किंवा सुप्रीम कोर्ट सीबीआयला तपासाचे आदेश देऊ शकते. राज्य सरकार सीबीआय तपासासाठी केंद्र सरकारला शिफारस करू शकते. जनतेच्या मागणीचा विचार करून केंद्र सरकार सीबीआयला तपासाचे आदेश देऊ शकते.

इतके सारे पर्याय स्पष्ट असताना मोदी सरकारने कानावर हात ठेवण्याचे कारण काय? पूर्वी देशात कुठेही एखादी खळबळजनक घटना घडली की विरोधकांची पहिली मागणी असायची ती त्या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपविण्याची. एखाद्या प्रकरणावर गदारोळ सुरू झाला की तो थांबवण्यासाठी सरकार सीबीआयकडे चौकशीचे आदेश देऊन मोकळे व्हायचे. म्हणजेच सीबीआयचा निष्पक्षपातीपणा आणि विश्वासार्हता वादातीत होती. काहीवेळा या यंत्रणेवर टीकाही व्हायची पण बहुतांशी तो राजकीय विरोधाचा भाग असायचा. मात्र, आज परिस्थिती बदलली आहे. गत काही वर्षांत केंद्रातील राज्यकर्ते वगळता सा-यांचा सीबीआयवरील विश्वास उडाला आहे. सीबीआय ही केंद्र सरकारची बटिक बनल्याची धारणा निर्माण झाली आहे, असा आरोप काँग्रेस सरकार सत्तेवर होते तेव्हाही होत होता परंतु आता भाजप सरकारच्या काळात सीबीआयची पानटपरी झाली आहे असे आरोप सर्रास होत आहेत. सीबीआयवर नियंत्रण कोणाचे हा कळीचा मुद्दा आज उपस्थित झाला आहे. सीबीआय, ईडी, आयटी अशा सरकारी विभागाचा, यंत्रणांचा निव्वळ राजकीय हेतूंसाठी कोण वापर करीत आहे ते आता लपून राहिलेले नाही.

त्यामुळे केंद्र सरकार आणि विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये सीबीआय तपासावरून वारंवार खटके उडत आहेत.राज्य सरकारची परवानगी न घेता सीबीआय त्या राज्यातील प्रकरणाचा तपास करू शकते का, हा या वादातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा. चार वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयसंदर्भात दिलेल्या निर्णयामुळे केंद्र सरकारला झटका बसला होता. सीबीआयने कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यापूर्वी संबंधित राज्याची परवानगी घेणे आवश्यक आहे असे स्पष्टपणे म्हटले होते. आतापर्यंत केरळ, प. बंगाल, छत्तीसगड, राजस्थान, महाराष्ट्र, पंजाब, आंध्र प्रदेश आणि झारखंड या राज्यांनी सीबीआयला दिलेली सर्वसाधारण संमती मागे घेतली आहे. राज्य सरकारची परवानगी आवश्यक असण्यावर न्यायालयानेच शिक्कामोर्तब केल्यामुळे आता सीबीआय केंद्राच्या नियंत्रणाखाली नसल्याची भूमिका केंद्र सरकारने घेतली आहे. म्हणजे सीबीआय राज्याराज्यात शिरून तपासाच्या नावाखाली धुडगूस घालणार आणि त्याचा आपल्याशी काही संबंध नाही असे म्हणत केंद्र सरकार कानावर हात ठेवणार! याआधी सीबीआयचे संचालक आलोक वर्मा यांना पदावरून हटवल्या प्रकरणी केंद्र सरकारला न्यायालयाने चपराक दिली होती. जर केंद्राचे नियंत्रण नसेल तर मग असा निर्णय घेतला कसा? नोकराने नको त्या उचापती केल्या तर त्यामागे त्याचा मालकच असतो तेव्हा सीबीआयचे अवमूल्यन करण्याऐवजी तिचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यातच देशाचे हित आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवायला हवी.

# भाजपचा भाषा बदल!

लोकसभा निवडणुकीचे बिगूल अत्यंत आत्मविश्वासाने फुंकताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हंगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'अब की बार चारसौ पार'चा नारा दिला होता. निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीपूर्वीच विरोधकांना पुरते गार करून टाकण्याचा हा 'माईंड गेम' होता. त्यात भाजप सुरुवातीच्या टप्प्यात यशस्वी झाल्याचेही चित्र देशात दिसत होते. मात्र, आता निवडणुकीच्या तिस-या टप्प्याचे मतदान पार पडलेले असताना भाजपची व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषा व प्रचाराची दिशा पुरती बदललेली पहायला मिळते आहे. आता स्वत: मोदीही 'चारसौ पार'चा उल्लेख करताना दिसत नाहीत. तर त्यांनी आता काँग्रेस निवडून आल्यास अमूक होईल, तमूक होईल, अशी भीती मतदारांना घालण्यास सुरुवात केली आहे.

पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानानंतर भाजपची भाषाच बदलून गेली. हा चमत्कार कसा घडला? तर तो काँग्रेसने भाजपचा माईंडगेम अत्यंत आक्रमकपणे त्यांच्यावरच उलटवल्यामुळे घडला! 'चारसौ पार'च्या भाजपच्या माईंडगेमला त्यांच्याच पक्षातील वाचाळवीरांनी आपल्या बेताल वक्तव्याने सुरुंग लावला! कर्नाटकचे खासदार अनंत हेगडे, अयोध्येचे खासदार लल्लू सिंह, राजस्थानच्या ज्योती मिर्धा यांनी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा मिळाल्यास संविधान बदलण्याचा विचार असल्याचे वक्तव्य केले आणि काँग्रेसला भाजपला त्यांच्याच माईंडगेममध्ये अडकविण्याची आयती संधी मिळाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या संधीचा अत्यंत आक्रमकपणे वापर करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान बदलण्यासाठी भाजपला चारशेपेक्षा जास्त जागा हव्या असल्याची तोफ डागली व भाजप पुन्हा सत्तेत आल्यास संविधान बदलले जाईल, हा संदेश दलित, आदिवासी, मागासवर्गीय व तळागाळातील लोकांपर्यंत काँग्रेसने अत्यंत आक्रमकपणे पोहोचवला.

भाजप आपल्याच वाचाळवीरांमुळे आपल्याच जाळ्यात अडकला व मागच्या दहा वर्षांत प्रथमच बॅकफूटवर गेला. स्वत: मोदी, शहा, नड्डा, संघप्रमुख मोहन भागवत यांना संविधान बदलले जाणार नसल्याचे खुलासे करणे भाग पडले. यामुळे भाजप या निवडणुकीच्या प्रचाराचे जे नॅरेटिव्ह सेट करू इच्छित होता ते समीकरण पुरते बिघडून गेले. मतदानाच्या दुस-या टप्प्यानंतर आता त्याची प्रचिती येते आहे. भाजपच्या सेनापतीच्या प्रचारात आता विकसित भारताचा संकल्प हा तोंडी लावण्यापुरताच येतो आहे. मोदींना दहा वर्षांच्या आपल्या सत्ताकाळानंतरही आपली सत्ता टिकविण्यासाठी काँग्रेसचे भूत लोकांसमोर उभे करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. काँग्रेसचे हे मोठे यशच मानायला हवे कारण मोदीपर्वात होणा-या निवडणुकीत प्रथमच काँग्रेसने भाजपला आपल्या मैदानावर खेळायला भाग पाडले आहे. यातूनच भाजपची प्रचाराची दिशा पुन्हा ध्रुवीकरणाच्या हुकमी मुद्यावर आली आहे. यातूनच काँग्रेसची सत्ता आली तर हिंदू समाजाची संपत्ती हिसकावून घेतली जाईल, त्याचे फेरवाटप करून ती मुस्लिम समाजात वाटली जाईल, ओबीसी आरक्षणात मुस्लिमांना वाटेकरी करण्यात येईल, असा प्रचार आता स्वत: मोदी यांनीच सुरू केला आहे.


थोडक्यात या चमत्काराचे श्रेय काँग्रेसला द्यावे लागेल. काँग्रेसने भाजपचा माईंडगेम त्यांच्यावरच उलटवून सर्वच भाजपविरोधी राजकीय पक्षांना संजीवनी बुटी मिळवून देणारा ठोस मुद्दा उपलब्ध करून दिला आहे. त्यातूनच भाजपची भाषा पुरती बदलली आहे आणि 'चारसौ पार'ची घोषणा भाजपच्या प्रचारातून पुरती हद्दपार झाली आहे. अर्थात भाजप एवढ्याने हार नक्कीच मानणार नाही. पक्ष संघटनेच्या प्रचंड ताकदीच्या जोरावर हरलेली बाजीही भाजप शेवटच्या क्षणी जिंकू शकतो. त्याचा प्रत्यय मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला आलेलाच आहे. अनुकूल वातावरण असतानाही काँग्रेसला मध्य प्रदेशात भाजपला सत्तेतून दूर करता आले नाही. मात्र, यातून काँग्रेसने योग्य तो बोध घेतलेला दिसतो. त्यातूनच सध्या तरी काँग्रेसने भाजपला त्यांच्याच माईंडगेमच्या जाळ्यात अडकवून टाकले आहे व त्यातून सुटण्याची धडपड म्हणून मोदी व भाजपने आपल्याच 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास'या घोषणेला तिलांजली देऊन ध्रुवीकरणाच्या हुकमी अस्त्राचा वापर सुरू केला आहे. त्यातूनच आता तिस-या टप्प्याचे मतदान पार पडले असताना प्रचाराचा स्तर प्रचंड घसरला आहे.



भाजपने संविधान बदलाची बेताल बडबड करणा-यांना तिकिट नाकारून डॅमेज कंट्रोलचा प्रयत्न केला असला तरी बृजभूषण यांच्या चिरंजीवांना तिकिट दिल्याने भाजपची सत्ता टिकविण्यासाठीची असहाय्यताही स्पष्ट होते आहे. तसेही भाजपला खरोखरच 'चारसौ पार'चा पल्ला गाठण्याचा आत्मविश्वास असता तर सुरत वा इंदूरमधून काँग्रेस उमेदवारांचे अपहरण करण्याचा मार्ग निवडावा लागला नसता. भाजप भलेही हे सगळे लोकशाही प्रक्रियेनुसार झाल्याचा दावा करत असला तरी तो खरा कोण मानणार? बहुमताचा आकडा गाठण्याची शाश्वती नसल्यानेच भाजपने हे तंत्र अवलंबिले आहे काय? असा प्रश्न या सगळ्या घटनाक्रमातून निर्माण होतो.

भाजपच्या कल्याणकारी योजनांचे लाभार्थी भाजपला नक्की मतदान करतील, हा भाजप नेत्यांचा दावा खरा मानला तरी या निवडणुकीत काँग्रेसने महागाई, बेरोजगारीच्या मुद्यावर सत्ताधारी भाजपची पुरती कोंडी केल्याचे चित्र तिस-या टप्प्यातील मतदानावेळीच स्पष्टपणे दिसते आहे. एकंदर या निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसने भाजपला सध्या तरी माईंडगेममध्ये पिछाडीवर टाकल्याचे स्पष्ट आहे आणि त्यातूनच भाजपची प्रचाराची भाषा पुरती बदलून गेल्याचे दिसते आहे. काँग्रेसने निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत माईंडगेममधील ही आघाडी कायम राखली तर ४ जूनला भाजपला सरकार स्थापनेसाठी जमवाजमवीची कसरत करावी लागत असल्याचे चित्र पहायला मिळू शकते. विरोधी पक्षांसाठी ही नक्कीच पर्वणी असेल! अर्थात उर्वरित पाच टप्प्यांत भाजप आणखी कोणते माईंडगेम खेळून विरोधकांवर प्रतिहल्ला चढवतो यावरही निकालाचे चित्र अवलंबून असणार आहे, हे नाकारण्यात काहीच अर्थ नाही. तूर्त निवडणुकीच्या तिस-या टप्प्यापर्यंत काँग्रेसने भाजपवर माईंडगेममध्ये आघाडी घेतल्याने भाजपची भाषा बदलली आहे, हे मात्र निश्चित!

# कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण केव्हा सुरू होणार?




नागपूर : ९ ते १४ वयोगटातील मुलींना कॅन्सर प्रतिबंधात्मक लस (पॅपिलोमाव्हायरस) देण्याची घोषणा सरकारने विधानसभेत करून कॅन्सरचे रुग्ण तपासणीसाठी राज्यात चतु:सूत्री कार्यक्रम आखण्यात आला आहे, असे सांगण्यात आले होते. परंतु अद्याप यावरील भारतीय बनावटीची प्रभावी प्रतिबंधक लस देण्याच्या मोहिमेला सुरुवात झालेली नाही. ही मोहीम केव्हा सुरू होणार असा प्रश्न उपस्थित झालाय.

गर्भाशयमुख कॅन्सरग्रस्त ६२ हजारांवर महिला आहेत. अशा रुग्णांचा जनजागृती आणि उपचाराअभावी अल्पावधीत मृत्यू होतो. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी घोषणा करून महिलांमध्ये उमेद वाढविली होती. परंतु घोषणेची अंमलबजावणी झाली नाही. एचपीव्ही विषाणूचे प्रमाण शरीर संबंध असलेल्या लोकांमध्ये जास्त प्रमाणात आहे.महिलांचा हा छुपा शत्रू असल्याने लवकर लक्षात येत नाही, मात्र लक्षात येतो तेव्हा आजार गंभीर झालेला असतो. यावर इतर देशांत लसीकरणावर भर दिला जातो. एकूण कॅन्सरग्रस्त महिलांपैकी ६ ते २९ टक्के महिला या कॅन्सरने त्रस्त असतात. देशात ५३ पैकी एका महिलेस या आजाराची जोखीम आहे. कॅन्सरबद्दल समाजात जनजागृती आवश्यक आहे. लक्षणे संबंध ठेवल्यानंतर वेदना संबंध ठेवल्यानंतर रक्तस्राव रजोनिवृत्तीनंतरही रक्तस्राव युरिन इन्फेक्शन वजन कमी होणे पायांना सूज येणे आजाराच्या अधिक प्रमाणाची कारणे गरीब ते मध्यम जीवनमान एपीव्ही विषाणूंची जास्त प्रमाणात लागण तपासण्या कमी प्रमाणात होणे गर्भाशय मुखाच्या कॅन्सरची प्रकरणे देशात : -२०२० मध्ये ७५ हजार २०९ प्रकरणांची नोंद - ३३ हजार ०९५ मृत्यू राज्यात : - २०२० मध्ये महाराष्ट्रात २ हजार ९५२ मृत्यू

मुलींच्या मनात या लशीविषयी काही समज-गैरसमज असू शकतात. त्याविषयीही योग्य जनजागृती होण्याची गरज आहे. गगर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्यास अनेक वर्षे लागतात. त्यामुळे त्याची लक्षणे सुरवातीला दिसत नाहीत.

यामुळे ही एचपीव्ही लस परिणामकारक ठरते. शासनाकडून मोफत लसीकरण कधी होणार हे माहीत नाही, मात्र काही स्वंयसेवी संस्थांच्या मदतीने सवलतीच्या दरात ही लस दिली जाते. शाळांमध्ये, वस्त्यांमधून प्रतिसाद मिळाल्यास आयएमएतर्फे ही मोहीम सुरु करण्यात येईल.

# सावधान! उन्हामुळे वाढले डोळ्यांच्या लर्जीचे प्रमाण



अकोट : उन्हाळ्याच्या दिवसांत डोळ्यांच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. डोळ्यांचीही काळजी घेणे अत्यंत गरजेचे असून, सूर्याच्या अतिनील किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करण्यासाठी आपण लेन्स असलेले गॉगल्स वा काळे गॉगल्स वापरले पाहिजेत.

तसेच डोळे कोरडे होण्यासाठी काळजी घ्यावी, असा सल्ला महाराष्ट्र शासन (आरोग्य सेवा)चे माजी नेत्रचिकित्सक अधिकारी तथा दृष्टी संयोजक डॉ. सुहास कुलट यांनी दिला आहे. या ऋतूत सूर्याची किरणे अधिक प्रखर होत असल्याने अनेकांचे डोळे कोरडे पडतात.

अति उष्णतेमुळे शरीरातले पाणी शोषून घेतले जाते, ज्यामुळे डोळ्यांमधील पाणी देखील सुकते. अशावेळी डोळ्यांची योग्य काळजी घेतली नाही, तर कोरड्या डोळ्यांच्या समस्या उद्भवतात. म्हणून उन्हाळ्यात डोळ्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी 'सकाळ'शी बोलतांना सांगितले.

सूर्यापासून येणारे अल्ट्राव्हायलेट किरणे डोळ्यांकरिता हानिकारक असतात. ही अल्ट्राव्हायलेट किरणे प्रकाशाहून अधिक वेगाने येतात. त्यामुळे फक्त उन्हातच नाही तर सावलीत देखील डोळ्यांशी निगडीत आजार होण्याची शक्यता असते.

यावर उपाय म्हणून उन्हात फिरताना सनग्लासेस जरूर लावा जे तुमच्या डोळ्यांचे अल्ट्राव्हायलेट किरणांपासून संरक्षण करतील. केवळ उन्हात फिरतानाच नाही तर सावलीत देखील सनग्लासेस लावायला हवी.


एरव्ही फॅशनकरिता वापरल्या जाणाऱ्या हॅट्स देखील तुम्हाला या हानिकारक किरणांपासून सुरक्षित ठेवतात. जास्त पाणी पिल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राहते आणि युव्ही किरणांच्या घातक परिणामांपासून आरोग्याचे संरक्षण होते. या ऋतूमध्ये डोळ्यांच्या अलर्जीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. तापमानातील प्रदूषणातील झालेली वाढ लक्षात घेता हा त्रास होऊ शकतो असे डॉ. सुहास कुलट सांगतात.

उन्हाळ्यात शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर समस्यांचा धोका असतो. यामुळे तुम्हाला डोळे कोरडे होण्याची समस्या देखील होऊ शकते. त्यामुळे डोळ्यांचे नुकसान होण्यापासून वाचवण्यासाठी दिवसभरात पुरेशा प्रमाणात पाणी पिणे आवश्यक आहे. डोळे कोरडे पडत असल्याची समस्या दिसल्यास अथाव तशी लक्षणे आढळल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

- डॉ. दर्शन कुलट, नेत्ररोग चिकित्सक, अकोट.

उन्हाळ्यात स्किन केअरसाठी बरेच लोक सनस्क्रीन वापरतात. परंतु, डोळ्यांजवळ आणि डोळ्यांच्या आजूबाजूला किंवा पापण्यांच्या भागात ते वापरताना सावधगिरी बाळगली पाहिजे. सनस्क्रीन, ज्यात एसपीएफ जास्त असते, ते चुकून आत गेल्यास डोळ्यांना त्रास होऊ शकते. जरी यामुळे डोळ्यांना कायमचे नुकसान होणार नाही परंतु, यामुळे डोळ्यांच्या भागावर

# सांधेदुखीपासून आराम मिळवण्यासाठी दररोज करा 'ही' योगासने, जाणून घ्या सरावाची सोपी पद्धत



मागील काही वर्षांमध्ये संधिवात या आजाराचे रूग्ण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. संधिवात हा एक सामान्य आजार आहे, हा आजार सांध्यांवर परिणाम करतो. १०० पेक्षा अधिक प्रकारचे संधिवात आहेत, जे सांध्यांतील स्वत:च्या पेशींवरच हल्ले करतात. या आजारामुळे पायांमध्ये आणि गुडघ्यांमध्ये प्रचंड वेदना होतात.

संधीवाताची काही सामान्य लक्षणे आहेत, जसे की, वेदना, सूज, लालसरपणा आणि चालण्याची क्षमता कमी होणे इत्यादी लक्षणे आहेत. परंतु, यावर उपचारांसोबतच तुम्ही योगाची ही मदत घेऊ शकता. जर तुम्हाला सांधेदुखीचा त्रास होत असेल तर तुम्ही काही योगासनांचा सराव दररोज करू शकता. कोणती आहेत ही योगासने? चला तर मग जाणून घेऊयात.

त्रिकोणासन हे योगासन संधिवातासाठी आणि एकूणच आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. हे योगासन करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर पायांमध्ये अंतर ठेवून सरळ उभे राहा. आता श्वास घ्या आणि नंतर श्वास सोडत तुमचे शरीर उजव्या पायाच्या दिशेने वाकवा आणि तुमचा हात सरळ तुमच्या डोक्यावर न्या.

आता तुमचा उजवा हात तुमच्या उजव्या कानाला समांतर असल्याची खात्री करा. त्यानंतर, तुमचा डावा हात तुमच्या पायाच्या पोटरीजवळ, घोट्यावर किंवा जमिनीला समांतर ठेवा. आता तुमचे शरीर बाजूला वाकले पाहिजे. आता श्वास घ्या आणि वरच्या दिशेला शरीर न्या आणि सुरूवातीच्या स्थितीमध्ये परत या. आता दुसऱ्या पायानेही असेच करा.

वृक्षासन वृक्षासन हे योगासन करायला अतिशय सोपे असून, या योगासनाच्या नियमित सरावामुळे शरीर तंदूरूस्त राहण्यास मदत होते. आरोग्यासाठी फायदेशीर असणाऱ्या या योगासनाचा सराव करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर सरळ रेषेत उभे राहा. आपले दोन्ही हात बाजूला ठेवा. आता तुमचा उजवा गुडघा वाकवा आणि तो डाव्या पायाच्या मांडीवर ठेवा.

या स्थितीमध्ये सरळ रहायचा प्रयत्न करा आणि शरीराचा तोल सांभाळा. आता श्वास घ्या आणि तुमचे दोन्ही हात डोक्याच्या बाजूने वरच्या दिशेला न्या. तुमच्या दोन्ही हातांचे तळवे एकत्र आणा, नमस्काराच्या मुद्रेमध्ये. आता सरळ पुढे व्हा, तुमची पोझ आहे तशी कायम ठेवा. या स्थितीमध्ये तुमच्या पाठीचा कणा सरळ असल्याची खात्री करा. काही वेळ या पोझमध्ये राहिल्यानंतर श्वास सोडा आणि पुन्हा सामान्य स्थितीमध्ये या.

# आज आहे जागतिक थॅलेसेमिया डे, जाणून घ्या या गंभीर आजाराबद्दल

जगाच्या कानाकोपऱ्यात असे काही गंभीर आजार आहेत. की, ज्यांची आपल्याला काहीच माहिती नसते. जगभरात असेही आजार आहेत ज्यावर काहीच उपचारही होत नाहीत. काही अनुवंशिक आणि साथीच्या आजारांचाही यामध्ये समावेश आहे. आज आपण अशाच एका फारशा चर्चे त नसलेल्या आजाराबद्दल जाणून घेणार आहोत.



थॅलेसेमिया हा एक अनुवांशिक आजार आहे आणि तो आई किंवा वडील किंवा दोघांच्या जनुकांमधील दोषामुळे होतो. रक्तातील हिमोग्लोबिन अल्फा आणि बीटा ग्लोबिन या दोन प्रकारच्या प्रथिनांनी बनलेले असते. थॅलेसेमिया या दोनपैकी कोणतेही प्रथिने निर्माण करणाऱ्या जनुकांमध्ये गडबड झाल्यास होतो. जीन्सच्या अल्फा किंवा बीटा ग्लोबिन स्थितीवर अवलंबून थॅलेसेमियाचे लहान-मोठे आणि मध्यवर्ती प्रकारांमध्ये विभागले गेले आहे.या रोगाचा उपचार कसा केला जाईल हे रोगाच्या तीव्रतेवर अवलंबून असते. लहान वयात निदान झालेल्या मोठ्या थॅलेसेमिया रुग्णांना आयुष्यभर रक्त चढवावे लागते. त्यामुळे त्यांचे आयुर्मान कमी होते. तर अल्पवयीन थॅलेसेमिया रुग्णांमध्ये केवळ अशक्तपणा दिसून येतो.

भारतात दरवर्षी दहा हजारांहून अधिक अर्भके थॅलेसेमियाने ग्रस्त जन्माला येतात. एवढी मोठी संख्या असूनही हा आजार रोखण्यासाठी योग्य ते उपाय केले जात नाहीत. अल्पवयीन रुग्णांना आपण या आजाराने त्रस्त आहोत याची जाणीव नसते. तसेच, मेजर थॅलेसेमियाचे १२ ते १५ रुग्ण आहेत. थॅलेसेमियाचे रूग्णांना माहितीच नसते की हा आजार त्यांना झाला आहे. त्यामुळेच त्यावर उपचार करण्यास उशीर होतो. थॅलेसेमियाची लक्षणे काय आहेत मुलांची नखे पिवळी पडणे मुलाच्या जबड्यात आणि गालांमध्ये असामान्य दिसू लागतात मूल वयाच्या तुलनेत खूपच लहान दिसते सतत सुकलेला चेहरा मुलांचे वजन वाढत नाही मुलांना दृष्टीदोष होणे. मुलांना श्वास घेण्यात अडचण होणे ही सामान्य लक्षणे थॅलेसेमियाची आहेत.

# उन्हाळ्यात अतिथंड पाणी, बर्फाचे सेवन घातक



वाढत्या उन्हामुळे सध्या सर्वत्र अतिथंड पाणी, बर्फाचे सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. परंतु याचे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. त्यामुळे केवळ घशाचे आजार होतात, असा समज आहे. परंतु घशासह कान आणि नाकाच्या आजारांनाही यामुळे निमंत्रण मिळत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

मागील काही दिवसांपासून उन्हाचा पारा ४० अंशाच्या आसपास जात आहे. प्रचंड उकाड्यापासून बचाव करण्यासाठी घरोघरी कुलर, एसीचा सहारा घेतला जात आहे. परंतु वाढत्या उकाड्यासमोर कुलर, एसी देखील फिके पडले आहेत. यामुळे लोक अतिथंड पाणी, बर्फ गोळा, बर्फाचे पाणी, बर्फ टाकून बनवलेले शरबत, मसाला ताक याचा वापर मोठ्या प्रमाणावर करत आहे.

यामुळे शरीराला काही वेळ दिलासा मिळत असला तरी, अतिथंड पदार्थांच्या सेवनाचे आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. टॉन्सिलचा त्रास असलेल्या रुग्णांना तर याचा अधिक त्रास होतो. त्यात हा बर्फ खाण्यायोग्य नसेल तर त्याचे आणखी गंभीर परिणाम होतात.

अतिथंड पदार्थांचे किंवा बर्फाच्या सेवनाने केवळ घसाच नव्हे कान आणि नाकाच्या आजारांना देखील निमंत्रण मिळते. बर्फ खाण्यायोग्य नसेल तर त्याचे आणखी विपरीत परिणाम होतात. यामुळे अतिथंड पदार्थांचे सेवन टाळावे. कुलर, एसीच्या वाऱ्यात जास्त वेळ बसू नये.

# बिनमुंडक्याच्या धडाची गोष्ट! चिकन ६५ मुळे मिळाला क्ल्यू, १०० रुपयांसाठी तरुणांची जिंदगानी बरबाद

वाळवा तालुक्याचे ठिकाण असलेल्या उरुण इस्लामपूरसाठी त्या दिवशीची सकाळ नेहमीप्रमाणेच उगवली मात्र त्या दिवशी वातावरणात नक्कीच काहीतरी वेगळेपण जाणवत होते आणि ती बातमी वार्यासारखी शहरभर पसरली. पाहता पाहता सार्या शहरातील लोक त्या शाळेकडे धाव घेऊ लागले काय झाले होते शाळेत!शाळेच्या मैदानात एका बाजूला दिसत असणारे ते दृश्य पाहताक्षणी अंगावर शहारे आणणारे ठरत होते. मैदानात एक शिर नसलेले मानवी धड पडले होते. मस्तक नसलेले धड पाहायला अवघे शहर लोटले होते. मृताचे वय फार तर एकवीस- बावीसच्या घरातील असावे. कपड्यावरून तर तो कष्टकरी असावा हे स्पष्टच होते. पाहणारे चर्चा करत होते कोण हा दुर्दैवी तरुण असावा आणि त्याचे मस्तक कोणी तोडून नेले असावे. काही क्षणातच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र मुंडके नसलेले धड पाहून पोलिसदेखील चक्रावून गेले. तोपर्यंत पोलिस निरीक्षक रावसाहेब सरदेसाई हे देखील घटनास्थळी दाखल झाले. घडलेल्या घटनेबाबत पोलिसांची चर्चा सुरू असतानाच दुसरी बातमी आली की, मैदानाच्या एका कडेच्या वीज खांबाला एक पिशवी अडकवली असून त्यात एक मुंडके प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळून ठेवले आहे.चिकन ६५चे वाळलेल्या पीसमुळे मिळाला क्ल्यू या सार्या घटनाक्रमाने पोलिसदेखील चक्रावून गेले होते. मात्र काहीच ट्रेस लागत नव्हता. सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पंचनामा करण्यात आला. मात्र हल्लेखोराने काहीच मागसूम ठेवला नव्हता. या तरुणाचा खून करण्याचे कारण काय, तो कोणी केला आणि का केला या प्रश्नांच्या वावटळीत पोलिस तपासाला दिशा मिळत नव्हती. सरदेसाई ऑफिसमध्ये काही काळ स्तब्ध बसले. विचार करता करता त्यांना काहीतरी क्लिक झाले. त्यांच्या मनाने काही तरी टिपले. क्षणात बेल वाजवून त्यांनी ड्रायव्हरला गाडी काढण्याचा आदेश दिला. 'चल' सरदेसाईंचा आदेश ऐकताच गाडी सुसाट सकाळच्या शाळेच्या पटांगणात आली. सरदेसाई घटनास्थळी गेले. बारकाईने पाहू लागले. मृतदेह पडलेल्या जागेत मार्किंग करण्यात आले होते. तिथे काही अंतरावर चिकन ६५चे वाळलेले पीस पडलेले होते! सरदेसाईंना एक क्ल्यू मिळाला होता.तपासाला काही तरी दिशा मिळाली होती. सरदेसाई यांनी तिघा कॉन्स्टेबलना बोलवून घेतले आणि त्या शाळेच्या जवळपास असलेल्या, रस्त्यालगत उशिरापर्यंत चिकन ६५ ची विक्री करणार्या हातगाडीवाल्यांना बोलवून आणण्याचा आदेश दिला. अर्ध्या-पाऊण तासाच दहा-बारा चिकन ६५ ची विक्री करणारे गाडेवाले त्यांच्यासमोर हजर झाले. त्यांनी प्रत्येकाला विश्वासात घेऊन विचारणा सुरू केली. एकाने सांगितले, साहेब, रात्री माझ्याकडे दोघेजण आले होते. दोघांनी एकेक प्लेट चिकन ६५चे पार्सल घेतले. ते नशेत एकमेकांना बडबडत होते. त्यातील एकजण सारखा म्हणत होता सूर्या, मी तुला सोडणार नाही. झाले. एवढाच धागा मिळाला खरा; पण त्याच्या मदतीने स्वर्ग गाठण्याचे आव्हान पोलिसांना होते.एव्हाना पोलिसांच्या पथकाने त्या शाळेच्या परिसरातील झोपडपट्टीत शोध मोहीम सुरू केली होती. यातच दोन दिवस गेले. घटनेच्या तिसर्या दिवशी एका पोलिसाला समजले की, त्या वस्तीमधील एक तरुण आपल्या मित्रासह तीन दिवसांपासून बेपत्ता आहे. पोलिस तपास करत करत त्या मित्राच्या घरी पोहोचले. नेमका तो त्याचवेळी घरी आलेला होता. पोलिसांना पाहताच तो पळू लागला. पण पोलिसांनी त्याला क्षणात जेरबंद केले. ठाण्यात आणून त्या तरुणाला पोलिसी खाक्याचा प्रसाद दिला. पण तो काहीच दाद देईना. मात्र शेवटी मेरी आवाज सुनो पुढे त्याने सपशेल लोटांगण घातले.शंभर रुपयांसाठी तरुणांची जिंदगानी बरबाद सूर्याने संदीपकडून शंभर रुपये उसने घेतले



होते. मात्र तो परत देण्यास टाळाटाळ करत होता. यावरून त्यांच्यात वारंवार वाद होत होता. त्या दिवशी नेहमीप्रमाणे चिकन ६५ खाण्यासाठी पार्सल घेतले. बरोबर पिण्यासाठी एकेक क्वार्टर घेतली. शाळेच्या आवारात चिकन खाता खाता संदीपने विचारले, सूर्या माझ्या पैशाचे काय करणार? कधी देणार आहेस? अक्काबाई पोटात गेलेला सूर्या म्हणाला, देत नाही जा. काय करणार आहेस. नशेत चूर झालेला संदीप आज ठरवूनच आला होता. आज कंडका पाडायचाच! त्याने हातातील पिशवीतून पटाशी काढली आणि काही कळायच्या आत सूर्याच्या मानेवर वार केला. मग संदीपने लाकूड तासावे तशी त्याची मान खापलण्यास सुरुवात केली. काही क्षणातच सूर्याचे मुंडके धडावेगळे झाले. त्याने ते मुंडके सोबत आणलेल्या प्लास्टिकच्या पिशवीत ठेवले. धड मैदानातच पडू दिले आणि मुंडके असलेली पिशवी मैदानाच्या बाजूला असलेल्या एका विजेच्या खांबाला अडकवली. संदीपच्या तोंडून हा सारा घटनाक्रम ऐकताना पोलिसदेखील हादरून गेले. मात्र केवळ शंभर रुपयांसाठी दोघा कोवळ्या तरुणांची जिंदगानी बरबाद झाली.

# अजबच, सव्वा किमीच्या अंतरात अकरा अँप्रोच रोड

दुभाजकाचा उपयोग काय? : सव्वा किलोमीटर अंतरामध्ये ११ ठिकाणी अँप्रोच रोड असतील तर दुभाजकांचा काय उपयोग? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच या प्रमुख रस्त्याच्या कडेने अतिक्रमण वाढत आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता अधिकच गडद झाली आहे.

किनवट. प्रतिनिधी. (शेख शौकत) :शहरातून जाणाऱ्या व शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते आयेप्पा स्वामी मंदिरापर्यंत राष्ट्रीय महामार्गावर शहरात जाण्यासाठी एक नव्हे दोन नव्हे अकरा जोडरस्ते (अँप्रोच रोड) राष्ट्रीय महामार्गाला जोडले आहेत. त्यामुळे राष्ट्रीय मार्गाने भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांवर शहरातून राष्ट्रीय महामार्गावर येणारी वाहने एकमेकांवर धडकण्याची भीती व्यक्त होत आहे. नांदेडहून भोकर, हिमायतनगर, किनवटमार्गे माहूरकडे जाणारा १६१ क्रमांकाचा हा राष्ट्रीय महामार्ग आहे. तो किनवट शहरातून जातो. त्यामुळे किनवट शहरातन राष्ट्रीय महामार्गावर येण्यासाठी जागोजागी जोड रस्ते तयार केले आहेत. अवघ्या एक ते सव्वा किलोमीटरच्या आत ११ अप्रोच (जोड रस्ते) दिले आहे. हे अप्रोच रोड महामार्गाने धावणाऱ्या वाहनांसाठी घातक मानले जात आहेत. अँप्रोच रोड अपघातांना एकप्रकारे निमंत्रणच देत आहेत.



शहरात येणाऱ्या वाहनांना भलेही फेरा झाला तरी चालेल पण केवळ एखाद्या ठिकाणीच अप्रोच (जोड रस्ते) द्यायला हवा होता. किनवट बसस्थानक परिसरात महामार्गावर खासगी वाहनांची वर्दळ मोठी असून शिस्त नाही. शहरातून येणारे वाहन अचानक कधी वळवेल हे सांगणे कठीण आहे. यातूनच वाहने एकमेकांना धडकण्याची भीती व्यक्त होत आहे. नियोजनाचा अभाव असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने लक्ष देऊन संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाय करावेत, अशी मागणी सजाण नागरिक करीत आहेत.




मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... अशा पद्धतीने मतदानाची टक्केवारी वाढवण्याकरिता मुंबई उपनगरातील कांदिवलीत दामू नगर मार्केट परिसरात निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यासोबत विभागातील जनतेने हातात फलके घेत आपला उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

## मांडवी वनपरिक्षेत्र जंगलाला आग लागण्याचे सत्र सुरूच, अवैध वृक्षतोडीचे पाप लपविण्यासाठी आग लावण्याची शंका

किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यात सहा पैकी एक मांडवी रेंजच्या कार्यकक्षेतील उमरी बाजार बिटातील जंगलाला चार दिवसापासून आग लागली आहे. आग प्रतिबंधक च्या जाळरेषेचे काम केले असते तर आग लागली नसती. झालेली चोरटी वृक्ष तोड लपवण्यासाठी लावलेली तर आग नसावी? असा तर्कवितर्काने जोर धरला आहे. या वनक्षेत्रपालांची प्रशासनावर पकड नसल्याचा हा परिणाम असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. बिटातील चोरट्या वृक्षतोडीच्या थूटांची विभाग स्तरीय पथकामार्फत चौकशी व्हायला हवी या मागणीने जोर धरला आहे. किनवटचे सहायक वनसंरक्षक हे असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था दिसते. यावर्षीच्या उन्हाळ्याची दाहकता लक्षात घेऊन त्यांनी कधी परिक्षेत्र निहाय दौरे काढून वन आणि वन्य जीवांच्या बाबतीत आढावा बैठका घेतल्या काय? समिक्षेसाठी आढावा बैठका आणि त्यातून त्यावर उपाय योजना आखण्याचे निर्देश दिल्याचे अद्यापतरी समोर आलेले नाही. त्यामुळे वन्य जीवांच्या पिण्याच्या पाण्यासाठी पुर्वीचे पानवठे तयार



असतांनाही पाणी पुरवठा केलेला नव्हता. माध्यमांनी सडकावल्याने कालपासून पाणी पुरवठा करीत असल्याचे समजते. नोकरशाही सावकारशाही पद्धतीने काम करीत असेल तर वरिष्ठांनी याकडे – लक्ष देण्याची गरज असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणने आहे. मांडवी वनपरिक्षेत्राच्या उमरी बाजार बिटातील नवरगावच्या जंगलात मागिल चार दिवसापासून वनव्याची आग लागली आहे. दरम्यान वनरक्षक व वनपाल जंगलाकडे फिरकलेच नाही म्हणून आगीने वाळलेली मोल्यवान व गैरी उभी झाडे जळाली. आगीत सापडलेला वन्यजीव जीवंत असेलच यावर प्रश्नचिन्हे निर्माण होणे स्वाभाविक आहे. तर दुसऱ्या बाजुने अवैध वृक्षतोड कर्मचाऱ्यांच्या अंगलट येऊ नये यासाठी आग लागूच नये म्हणून जाळरेषा तयार केलेल्या नसल्याची चर्चा आहे. थुटांचे पुरावेच नष्ट करण्यात आली आहेत. नैसर्गिक व लागवड केलेले कोणत्या जातीची किती वृक्ष याची आकडेवारी वनविभागाकडे असेलच असे नाही. त्यामुळे वृक्षतोडीचा अंदाज घेणे अवघड कारण या आगीत बुडातून झाडे व बूड जळून पुरावा नाहिसा होण्यास मदत होते. नांदेड उपवन संरक्षकांचे मांडवी सारख्या दूर्गम क्षेत्राकडे लक्ष पोहोचेल असे वाटत नाही. अर्थपूर्ण व्यवहारातून सर्वकाही कामकाज चालते. त्यामुळे प्रत्यक्ष जंगलाच्या भेटीचे त्यांनाही फारशे देणे घेणे वाटत नसावे. लागलेल्या आगीची माहिती पहिल्याच दिवसी संबंधित वनरक्षकाने अथवा वनपालाने मांडवी रेंजला दिली का? दिली असेल तर तात्काळ आग का थांबवण्यात आली नाही. वेळीच रिपोर्ट दिला नसेल तर संबंधितावर दप्तर दिरंगाईची कारवाई व्हायला हवी. अशी मागणी पर्यावरण प्रेमी कडून होत आहे.

## काँग्रेस बॅकफूटवर! वादग्रस्त वक्तव्यानंतर सॅम पित्रोदा यांचा इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

नवी दिल्ली, : सॅम पित्रोदा यांनी इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे.

श्री सैम पित्रोदा ने अपनी मर्ज़ी से इंडियन ओवरसीज कांग्रेस के अध्यक्ष पद से इस्तीफ़ा देने का फ़ैसला किया है। कांग्रेस अध्यक्ष ने उनका इस्तीफ़ा स्वीकार कर लिया है। सॅम पित्रोदा यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आक्रमक हल्ल्यानंतर काँग्रेस बॅकफूटवर आली होती. पित्रोदा यांच्यावर कारवाई करण्यासाठी काँग्रेसवर दबाव वाढला होता. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यापर्यंत चांगली लढत देणाऱ्या काँग्रेसला कोणतीही मोठी चूक करायची नाही. मात्र पित्रोदा यांच्या वक्तव्यामुळे काँग्रेसला मोठे नुकसान होण्याची भीती वाटू लागली आहे.



राहुल गांधी आणि सॅम पित्रोदा यांच्यातील जवळीक पाहून काँग्रेसला कठोर पावले उचलण्याचे धाडस करता आले नाही. दरम्यान, याविषयी काँग्रेस पक्षनेतृत्वाने राहुल गांधींशी चर्चा केल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यानंतर राहुल गांधींनी स्वतः पित्रोदा यांना राजीनामा देण्यास सांगितले. राहुल गांधी यांना विचारल्यानंतरच पित्रोदा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांनी तो लगेचच स्वीकारला. मात्र, औपचारिकपणे काँग्रेसने या गोष्टीला पित्रोदा यांचा निर्णय असल्याचे म्हटले आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले की, सॅम पित्रोदा यांनी स्वेच्छेने इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस अध्यक्षांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. विशेष म्हणजे सॅम पित्रोदा यांनी वारंवार दिलेल्या वादग्रस्त विधानांमुळे काँग्रेसला बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला होता. दुसऱ्या टप्प्यातील मतदानापूर्वी त्यांनी संपत्ती कर' या विषयावर बोलून त्यांनी भाजपला काँग्रेसविरुद्ध आयता मुद्दा दिला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दुसऱ्या टप्प्यात या मुद्द्यावरून काँग्रेसविरोधात प्रचार केला होता. आता चौथ्या टप्प्यातील प्रचारादरम्यान त्यांनी पुन्हा एकदा भारतीय लोकांच्या रंगाबाबत वादग्रस्त विधान केले आहे. त्यानंतर पंतप्रधानांनी काँग्रेसवर त्वचेच्या रंगाच्या आधारे देशाचे विभाजन केल्याचा आरोप केला आहे.

## एअर इंडिया एक्सप्रेसच्या कर्मचारी संप प्रकरणी काँग्रेसचे नागरी उड्डान मंत्र्यांना पत्र

नवी दिल्ली, : एअर इंडिया एक्सप्रेसच्या कर्मचारी संप प्रकरणी काँग्रेसने बुधवारी (दि. ८) नागरी उड्डान मंत्र्यांना पत्र लिहीले. एअर इंडिया एक्सप्रेसचे शेकडो कर्मचारी अचानक संपावर गेले. त्यामुळे एअर इंडिया एक्सप्रेसच्या ८० पेक्षा अधिक विमानांचे उड्डाण रद्द झाले. याप्रकरणी नागरी उड्डान मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मध्यस्थी करण्याची मागणी, काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी पत्राद्वारे केली.



एअर इंडिया एक्सप्रेसचे शेकडो कर्मचारी संपावर गेल्यामुळे, कंपनीला अनेक विमान उड्डाणे रद्द करावी लागली. यामुळे अनेक प्रवाशांची गैरसोय झाली. केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी याप्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून कर्मचाऱ्यांच्या मागण्या जाणुन घेवून संप सोडवावा. तसेच एअर इंडिया एक्सप्रेसची उड्डाणे लवकरात लवकर पूर्ववत करावीत, अशी मागणीही के. सी. वेणुगोपाल यांनी केली.काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी लिहिले की, एअर इंडिया एक्सप्रेस ही अनेक लोकांना सोईस्कर विमान कंपनी आहे. जगभरातील मध्यमवर्गीय कर्मचारी आणि प्रवासी याद्वारे प्रवास करतात. मात्र कर्मचाऱ्यांच्या संपामुळे ८० पेक्षा अधिक उड्डाणे रद्द झाली आहेत. प्रवाशांना याचा मोठा त्रास झाला. लवकरात लवकर एअर इंडिया एक्सप्रेसची उड्डाणे पूर्ववत करण्यात यावी, असेही त्यांनी लत्रात लिहिले आहे.

# रणरणत्या उन्हात प्रवासी वाहने सुसाट

लातूर : प्रतिनिधी शाळानां सुट्या आहेत. काल लातूर लोकसभा मतदारसंघासाठी मतदानही पार पडले. त्यामुळे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ज्यांना एस. टी. महामंडळाच्या बसेने प्रवास करणे शक्य नाही, असे प्रवासी काळी–पिवळी, टमटम अशा प्रवासी वाहनांकडे वळतात. सध्या रणरणते उन्ह आहे. अशा परिस्थितीत प्रवासी वाहने सुसाट आहेत. प्रवासी क्षमतेसह वेग मर्यादेचे उल्लंघन सर्रासपणे होत असताना त्याकडे मात्र वाहतूक नियंत्रण पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे.

लातूर शहर हे व्यापारी व शैक्षणिक शहर आहे. संपुर्ण जिल्हा आणि तेलंगाना स्टेट, कर्नाटक सीमावर्ती भागातूनही असंख्य व्यापारी, नागरिक, रुग्ण लातूरला येतात. एस. टी. महामंडळाच्या बसेसची सोय असली



तरी कधी कधी एस. टी. बस न मिळणे किंवा अन्य कारणाने प्रवासी खाजगी प्रवासी वाहूकीच्या वाहनांकडे वळतात. काळी–पिवळी, टमटमने प्रवास करणा–या प्रवाशांचीही संख्या मोठी आहे. सध्या लग्नसराईचेही दिवस आहेत. त्यामुळेही प्रवाशांची संख्या वाढली आहे. अशावेळी काळी–पिवळी आणि टमटम या वाहनांत प्रवासी क्षमतेपेक्षा प्रवासी बसवून वेग मर्यादेचे उल्लंघन करीत बेदरकारपणे वाहन चालविले जात आहे.गेल्या पंधरा दिवसांपासून उष्णतेची लाट लातूर जिल्ह्यात आहे. उन्हाचा कहर नागरिकांच्या जिवाची काहिली करीत आहे. अशा परिस्थितीत प्रवासी क्षमतेपेक्षा दुप्पट प्रवासी वाहनात कोंबून अतिवेगाने वाहने चालविली जात आहेत. वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहेत. दुर्दैवाने अपघातासारखी एखादी दुर्घटना घडली तर त्यास जबाबदार कोण?, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

## राज्यस्तरीय नाट्यगीत गायन स्पर्धेत रिद्मचे यश

लातूर : प्रतिनिधी शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या निमित्ताने नाट्य परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जागर नाट्यकलेचा स्पर्धा महोत्सवामध्ये नाट्यपद गायन स्पर्धेची अंतिम फेरी मुंबई येथे नुकतीच झाली. रिदम पाटील हिने तृतीय पारितोषीक पटकावले. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यांमधून अनेक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी लातूर येथून तीन स्पर्धकांची निवड झाली होती,या स्पर्धेमध्ये अंतिम फेरीमध्ये येथील रिदम दत्ता पाटील हिने आपल्या गोड आवाजातील राधामाई या संगीत नाटकामधील 'खेळेल का देव माझिया अंगणी' हे नाट्यगीत अतिशय उत्तम सादरीकरण करुन सर्व रसिकांची मने जिंकली व या स्पर्धेमध्ये तिने तृतीय पुरस्कार प्राप्त केला. या पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम दहा हजार रुपये मानचिन्ह व प्रमाणपत्र असे होते.

## नाशिकच्या रोकडोबा वाडीत पुर्ववैमन्यसातून युवकाची हत्या, सात जणांच्या टोळक्याने एकट्याला गाठलं

नाशिक : गतवर्षी गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादाची कुरापत काढून सात जणांच्या टोळक्याने युवकाला मंगळवारी (दि.७) रात्री एकटे गाठून त्याच्यावर शस्त्रांनी वार करीत खून केला. या हल्ल्यात अरमान मुन्नावर शेख (१८, रा. सुंदरनगर) या युवकाचा मृत्यू झाला. याप्रकरणी उपनगर पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे.




अरमान शेख हा मंगळवारी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास वाहनावरुन सुंदरनगर येथे मित्रासोबत आला होता. त्यावेळी संशयित चंप्या उर्फ आकाश दिनकर याने अरमानला वाहन थांबविण्यास सांगितले. आकाशसोबत रवी राठोड, झिंग्या उर्फ संदेश महाकाली हे होते. तर काही वेळात दुचाकीवरुन आकाश तपासे (रा. गुलाबवाडी, मालधक्का रोड), टक्या उर्फ प्रेम व दोन अनोळखी तिथे आले. 'तू आक्या भाईला मारतो का, घे आता रिप्लाय', असे म्हणून आकाशने अरमानवर हत्याराने वार केले. त्यानंतर सारेजण पसार झाले. रहिवाशांनी अरमानला बिटको रुग्णालयात दाखल केले. मात्र अरमानचा मृत्यू झाला होता. दरम्यान, उपनगर पोलिस ठाण्यात याप्रकरणी संशयितांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून तपास केला. उपनगर पोलिसांनी अरमानच्या खून प्रकरणात संशयित रवी राठोड, झिंग्या उर्फ संदेश महाकाली, आकाश दिनकर यांना ताब्यात घेतले आहे. इतर हल्लेखोरांच्या मागावर पथके रवाना करण्यात आली.

गुन्हा घडल्यानंतर पोलिस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक आयुक्त डॉ. सचिन बारी, उपनगरचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे, गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक निरीक्षक सचिन चौधरी यांचे पथक दाखल झाले. संतप्त नातलगांनी राग व्यक्त करत गुन्हेगारांच्या अटकेची मागणी केली. अरमानचा मित्र हितेश खलसे याच्या फिर्यादीवरून उपनगर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल आहे.

## वाढतच चाललाय 'पाताळाचा रस्ता'! नवे संशोधन काय सांगते?

मॉस्को : रशियाच्या सैबेरियातील सर्वात मोठे पर्माफ्रॉस्ट क्रेटर 'बटागाइका' सातत्याने वाढतच चालले आहे. 'पाताळाचा रस्ता किंवा द्वार' असे म्हटले जाणारे हे विवर मोठे होत चालल्याचे एका नव्या संशोधनातून समोर आले आहे. पर्माफ्रॉस्ट म्हणजे वर्षानुवर्षे गोठलेली जमीन. या जमिनीत बर्फ, धूळ आणि खडक गोठलेले असतात.

हे पर्माफ्रॉस्ट वितळत असल्याने आता ते दरवर्षी ३५ दशलक्ष घनफूट म्हणजेच दहा लाख घनमीटरने वाढत असल्याचे दिसून आले आहे. बटागाइका क्रेटरला सर्वप्रथम १९९१ मध्ये रशियाच्या उत्तर याकुतियाच्या याना अपलँडमध्ये एक दरड कोसळल्यानंतर पाहण्यात आले होते. त्यावेळी डोंगराचा एक भाग खाली कोसळला होता. त्यामुळे पर्माफ्रॉस्टचे स्तर उघड झाले, जे तब्बल ६ लाख ५० हजार वर्षांपासून गोठलेले होते. हा सैबेरियाचा सर्वात जुना पर्माफ्रॉस्ट आहे.

वैज्ञानिकांना आता दिसून आले की, बटागे मेगास्लंपच्या खडकाचा दर्शनी भाग पर्माफ्रॉस्ट वितळत असल्याने दरवर्षी ४० फूट म्हणजे बारा मीटरच्या दराने मागे हटत आहे. डोंगराचा कोसळलेला भाग जो हेडवॉलपासून १८० फूट खाली आला होता, तो वेगाने वितळत आहे. २०१४ मध्ये मेगास्लंपची रुंदी ७९० मीटर होती. त्यानंतर गेल्या दहा वर्षांमध्ये ती २०० मीटर रुंद झाली आहे. बटागेची सॅटेलाईट प्रतिमा, क्षेत्रातील मोजमाप आणि डेटाचे निरीक्षण यांच्या आधारे याबाबतचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

# २० लाखांसाठी बांधकाम व्यावसायिकाच्या मुलास जीवे मारण्याची धमकी

नाशिक : जागा खरेदी–विक्रीच्या वादातून दोघांनी मिळून एका बांधकाम व्यावसायिकाकडे २० लाख रुपयांची खंडणीची मागणी केली. तसेच पैसे न दिल्यास मुलास जीवे मारण्याची धमकी व्यावसायिकास दिली. याप्रकरणी दोन संशयितांविरोधात सरकारवाडा पोलिसांत खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कॅनडा कॉर्नर येथील वसंत मार्केटमध्ये कार्यालय असलेले बांधकाम व्यावसायिक समीर श्यामराव केदार (४८) यांच्या फिर्यादीनुसार, संशयित सूर्यभान गयाजी जाधव व ओम सूर्यभान जाधव (दोघे रा. गंगापूर गाव) यांनी खंडणीची मागणी करीत धमकी दिली. सरकारवाडा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केदार व जाधव यांच्यात जमिनीचे व्यवहार झाले होते. संशयित जाधव हा एक जमिन खरेदी करणार होता. मात्र, त्याचा व्यवहार पूर्ण न झाल्याने केदार यांनी संबंधित जमीन खरेदी केली. त्यानंतर जाधव याने केदार यांना आणखी एका जागेचा प्रस्ताव ठेवला. त्यासाठी केदार यांनी जाधव यांना




धनादेश दिले. मात्र, जाधव यांच्याविरोधात गुन्हा असल्याचे समजल्याने केदार यांनी व्यवहारापोटी दिलेल्या धनादेशाचे पेमेंट थांबवले. त्यामुळे जाधव यांना पैसे मिळाले नाहीत. दरम्यान, इतर गुन्ह्यात संशयित जाधव हा पाच वर्षांपासून कारागृहात होता. दोन वेळेस ते जामिनावर बाहेर आले. त्यानुसार २३ एप्रिलला त्यांनी केदार यांचे कार्यालय गाठून पैशांची मागणी करीत धमकावल्याची तक्रार आहे. याप्रकरणी पोलिस संशयितांचा शोध घेत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE